लातूर, उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यांसाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळासाठी विहित करण्यात आलेल्या अटींची पुर्तता करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. एसजीए-२०१७/प्र.क्र.१११/कामगार-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०६ मार्च, २०१९.

वाचा :-

१. कामगार आयुक्त यांचे पत्र क्रमांक सुरक्षा/सु.स.स.बै./२०१७/कार्या.१४/२३७, दि.१९.०४.२०१७
२. शासन अधिसूचना क्र.एसजीए-२०१७/प्र.क्र.१११/कामगार-५, दि.१६.०८.२०१७.
३. शासन अधिसूचना क्र.एसजीए-२०१७/प्र.क्र.१११/कामगार-५, दि.२२.०८.२०१७.
४. शासन निर्णय क्रमांक. एसजीए-२०१७/प्र.क्र.९९/कामगार-५, दि.१०.१०.२०१८.
५. शासन निर्णय क्रमांक. एसजीए-२०१८/प्र.क्र.९०२/कामगार-५,दि.१३.०२.२०१९.
६. शासन अधिसूचना क्र.एसजीए-२०१७/प्र.क्र.२८७/कामगार-५, दि.१४.०२.२०१९

प्रस्तावना :-

लातूर, उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यातील महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षकांची सेवा प्राप्त करणाऱ्या आस्थापना/कारखान्यांची संख्या, मंडळाची आर्थिक क्षमता इ. बाबींचा सर्वंकष विचार करुन विहित अटींच्या अधिन राहून मंडळाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ अंतर्गत लातूर, उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्याच्या क्षेत्रामध्ये सदर अधिनियमाच्या तरतुदी संदर्भाधीन अधिसूचना दि.१६.०८.२०१७ अन्वये लागू करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे सदर जिल्ह्याकरीता (स्वतंत्र) सुरक्षा रक्षक मंडळाची स्थापना संदर्भाधीन दि.२२.०८.२०१७ रोजीच्या अधिसूचनान्वये करण्यात आली आहे. तसेच सदर जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना २००२ च्या तरतुदी लागू करण्यासंदर्भाधीन दि.१४.०२.२०१९ रोजी शासन अधिसूचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर जिल्ह्यातील सुरक्षा रक्षक मंडळाचे कामकाज प्रभावीपणे व सक्षमरित्या सुरू होण्याच्या दृष्टीने खालील नमूद अटींची अंमलबजावणी करण्यांसदर्भात सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

लातूर, उस्मानाबाद आणि बीड जिल्हयाकरिता स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकरिता खालील अटींची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी.

१. नव्याने स्थापन करण्यात आलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाचा सचिव पदाचा कार्यभार, सरकारी कामगार अधिकारी लातूर यांना अतिरिक्त स्वरुपात देण्यात यावा.
२. मंडळाचे अध्यक्ष व सचिव पदाचा कार्यभार अतिरिक्त स्वरुपात देण्यामुळे उक्त अधिकारी मंडळात पूर्ण वेळ उपलब्ध होऊ शकत नसल्याने मंडळाचे कामकाज इतरवेळीही सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मंडळात एका कार्मिक अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी.

३. नव्याने निर्माण करण्यात आलेल्या सदर मंडळासाठी सुरवातीस कार्यालयीन जागा घेण्याची आर्थिक क्षमता राहणार नसल्यामुळे यांचे कार्यालय सहायक कामगार आयुक्त, लातूर या कार्यालयात सुरू करण्यात यावे.

४. लातूर, उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यातील खाजगी सुरक्षा रक्षकांची सेवा प्राप्त करणाऱ्या आस्थापना/कारखान्यांची संख्या तसेच कार्यरत प्रस्तावित खाजगी सुरक्षा रक्षकांची संख्या विचारात घेता जास्तीत जास्त सुरक्षा रक्षकांची दि.१०.१०.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार सुरक्षा रक्षक मंडळात नोंदणी करून घेण्यासाठी एक विशेष मोहिम मंडळामार्फत राबविण्यात यावी. तसेच दि.१३.०२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील कामकाजाकरिता संगणक प्रणाली विकसित करण्यात यावी.

५. मंडळाला प्राप्त होणाऱ्या प्रशासकीय लेव्हीमध्ये वाढ होऊन मंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यानंतर मंडळासाठी स्वतंत्र कार्यालय तथा कर्मचारीवृंद करता येईल.

६. वर्ग ३ व ४ च्या पदांचा कार्यभार लातूर, उस्मानाबाद तसेच बीड जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळातील कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात देण्यात यावा. मंडळातील कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्रपणे आकृतिबंध तयार करण्यात येऊन पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल. दरम्यान शासनाच्या प्रचलित धोरणानुसार बाह्य यंत्रणेमार्फत अशी पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात यावीत.

७. वेतन, भत्ते व इतर प्रशासकीय खर्च भागविण्याकरीता औरंगाबाद मंडळाकडून सदर मंडळास रु.१० लाख बीज भांडवल कर्ज रुपाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

८. लातूर, उस्मानाबाद आणि बीड या मंडळाने सदर कर्जाची परतफेड ५ वर्षानंतर दरवर्षी रु.२ लाख याप्रमाणे औरंगाबाद मंडळास करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०१९०३०६११४७२४९३१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sanjay Vithoba Kalbhor

Digitally signed by Sanjay Vithoba Kalbhor
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f38e777689de3b7f0254b419127daa9612b470f287aa6310645bf8f39ddb6811, serialNumber=df8236826d559ff6f7f76f1d6d59c70c92e9c010f48017078d824be6d2b5b8d1, cn=Sanjay Vithoba Kalbhor
Date: 2019.03.06 17:50:12 +05'30'

(संजय काळभोर)
कार्यासन अधिकारी

प्रत:-

१. मा.राज्यपाल यांचे सचिव (पत्राने)

२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय,मुंबई

३. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,

४. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, अ-६, मंत्रालय समोर,नरिमन पॉईट, मुंबई,

५. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,

६. मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

८. प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,

९. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक, मुंबई,

११. कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा, मुंबई,

१२. सर्व सह/ उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई

१३. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,

१२. सर्व सुरक्षा रक्षक/माथाडी मंडळे,

१३. सर्व अवर सचिव /कार्यासन अधिकारी, कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई,

१४. निवड नस्ती (कामगार-५).